# चांगभलं

रामदास फुटाणे



ग्रं. सं. ठाणे
षय ..
. क्र.
REFBK-0026135
REFBK-0026135

संदर्भ
काव्य
२९१०
२९१३५
२२।५।१००

२९१०
काव्य २९१३५
२२।५।१००

# चांगभलं

## प्रासंगिका

रामदास फुटाणे

REFBK-0026135

REFBK-0026135

ऋतुराज प्रकाशन, मुंबई - २०.

● प्रकाशक :
अजय अशोक फुटाणे
ऋतुराज प्रकाशन,
६१ डी रोड, मुंबई - २०

● मुद्रक :
किर्लोस्कर प्रेस,

प्रकाशन काल -
२७ मार्च १९९०
चैत्र शु. १ शके १९१२

● मुखपृष्ठ :
रामदास फुटाणे

● रचना :
प्रकाश नेवासकर

● व्यंगचित्रे :
संजय मिस्त्री

● सर्वाधिकार :
रामदास फुटाणे
तुलसी निवास
६१ डी रोड, मुंबई - २०

● प्रमुख विक्रेते :
उत्कर्ष बुक सर्व्हिसेस - पुणे - ४

मूल्य - २५ रूपये

चालू लोकल पकडणाऱ्या मुंबैकरांना -

आभार

विजया राजाध्यक्ष, माधव गडकरी, गोविंद तळवलकर,
प्रकाश कुलकर्णी, अरुण टिकेकर,
राजाभाऊ बेहेरे, श्री. द. सरदेशमुख, इसाक मुजावर,
लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सा. जत्रा, नवशक्ति,

# प्रस्तावना

रामदास फुटाणे यांचा 'सफेत टोपी लाल बत्ती' हा व्यंग कवितांचा संग्रह १९८६ मध्ये प्रकाशित झाला, अवघ्या दीड वर्षात त्याची दुसरी आवृत्ती निघाली; दरम्यान फक्त दोन वर्षाचा कालावधी गेला; आणि आता त्यांचा 'चांगभलं' हा दुसरा संग्रह प्रकाशित होत आहे. फुटाण्यांच्या निर्मितीचे हे चित्र त्यांच्या लेखनाच्या वेगाची व त्याला लाभलेल्या उत्तम प्रतिसादाची साक्ष देते.

मराठी कवितेच्या प्रांतातील एकंदर परिस्थिती फारशी समाधानकारक नसूनही हे कसे घडले ? पाचसहा वर्षांपूर्वीपर्यंत फुटाण्यांचे नांव कवी म्हणून फारसे ठाऊक नव्हते. ते इतक्या अल्पावधीत कसे लोकप्रिय झाले ? फुटाण्यांनी आपला वाचक वर्ग वा श्रोतावर्ग कसा हेरला, कसा प्रतिसाद सन्मुख ठेवला ? या व अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे फुटाण्यांनी ज्या स्वरुपाची कविता लिहिली त्या स्वरुपाशी संबंधित आहेत. ही व्यंग उपाहासात्मक स्वरुपाची दंभस्फोटाची कविता आहे. ती पुष्कळ वेळा 'वात्रटिके' च्या वळणानेही जाते. तिला खाद्य पुरविणाऱ्या विषयांचा आज आपल्या समाजात – विशेषतः त्यांच्या राजकारण या कक्षात – तोटा नाही! नित्य नवे विषय. ते टिपणारी नजर फक्त पाहिजे.

अशी तयार नजर फुटाण्यांपाशी आहे. ती एकाच विषयाच्या मागे न धावता अनेक विषयांना स्पर्श करते. त्या विषयांना त्या त्या काळातील घटनांचा संदर्भ असतो. त्यामुळे ही कविता अर्थातच 'प्रासंगिक' होते. ती तशीच ठेवणे फुटाण्यांना अभिप्रेत असावे. 'चांगभलं' मधील कवितांचे 'प्रासंगिक' असे वर्णन त्यांनी स्वतःच केले आहे; त्यामुळे त्यांना या प्रासंगिकतेची जाणीव आहे हे तरी निश्चितच. अशी ही प्रासंगिक कविता झपाट्याने लिहिणे मुळी आवश्यकच असते. आणि ती स्वांतःसुखाय नसल्यामुळे तिचा उद्देश वाचकश्रोत्यांशी संवाद साधणे, त्यांना आपल्या उपहासात सहभागी करून घेणे हा असल्यामुळे, त्यांच्याखेरीज जगूच शकत नाही. तिच्यावर तशी पाळीही येत नाही; कारण वाचकश्रोत्यांना आपल्या वतीने बोलणारा कोणीतरी प्रवक्ता हवा असतो. त्यांच्याही मनात काहीतरी सलत असते, त्यांनाही कशाचेतरी हसू येत असते. ते त्या सलांच्या व हास्यांच्या सुसंबध्द अविष्काराच्या शोधात असतात. त्यांना फुटाण्यांच्या ठिकाणी हा सुसंबध्द अविष्कार देणारा प्रवक्ता सापडला. फुटाण्यांना क्रियाशील ठेवले ते समाजाने आणि वाचकश्रोत्यांना क्रियाशील ठेवले ते फुटाण्यांनी. या परस्पर संबंधात व्यत्यय असा कुठे आलाच नाही.

फुटाण्यांची कविता वेगळ्या स्वरुपाची असती तर हे घडले नसते – निदान ते अवघड झाले असते. हे जाणून फुटाण्यांनी जाणूनबुजून कवितेच्या या स्वरुपाची निवड केली असे मात्र म्हणता येणार नाही. ते स्वरुप त्यांना त्यांच्या व्यक्तिमत्वातील गुणधर्मामुळे व त्यांच्या पार्श्वभूमीमुळे सहजपणे सापडले. त्यावेळी त्यांना आपण या वाटेने किती पुढे जाऊ शकणार आहोत, आणि याला कसा प्रतिसाद मिळणार आहे याची कदाचित कल्पनाही नसेल. त्यांना अशी कविता लिहावीशी वाटली म्हणून त्यांनी ती लिहिली.

पण मुळात फुटाण्यांना कविता व अशी कविता का लिहावीशी वाटली ? याचे एक प्राथमिक कारण, त्या स्वरुपाच्या काव्यपरंपरेचा किंवा विशिष्ट कवीचा संस्कार हे असू शकते. पण फुटाण्यांच्या कवितेला ते कारण लागू पडत नाही. कारण मराठीत व्यंग, उपहासात्मक प्रासंगिक कवितेची सलग परंपरा अस्तित्वात नाही. उपहास हे ज्यांच्या कवितेचे महत्वाचे अंग आहे असे अनेक कवी आहेत; उपहासाच्या जरा खाली उतरून खट्याळ वात्रट लेखनही काहींनी केले आहे. येथे पाडगांवकरांचे नाव कोणालाही विशेषत्वाने आठवेल; कारण त्यांच्या कवितेत हे दोन्ही प्रकार आहेत. पण हिला काही परंपरा म्हणता येणार नाही. मराठीत ती का असू नये हा स्वतंत्र विषय आहे. पण असती तर ती फुटाण्यांमागे उभी राहिली असती असे वाटत नाही. कारण आपल्या काव्यलेखनाला आरंभ करण्यापूर्वी, फुटाण्यांना कोणाही कवीने प्रभावित केले असेल, असे त्यांच्या कवितेवरून दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या कवितेचे थोडे नुकसानही झाले असेल, पण नुकसानापेक्षा फायदा अधिक झाला. तो असा की या कवितेला एक स्वतंत्र ताजा चेहरामोहरा मिळाला; आणि वाचकश्रोत्यांनाही तो ताजेपणा आवडला. पण या स्वतंत्रपणाची दखल घेताना, फुटाण्यांवरील एका संस्काराचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तो संस्कार दत्तू बांदेकर यांचा. फुटाण्यांचा पहिला संग्रह बांदेकरांनाच अर्पण केला आहे. बांदेकरांच्या गद्य लेखनातील विनोदाचे त्या मागील उद्देशाचे व तो मुख्यतः नियतकालिकातून प्रकाशित झालयामुळे त्याला आलेल्या प्रासंगिक स्वरुपाचे स्मरण फुटाण्यांची कविता वाचताना होते. व्यंग कवितेची वाट त्या लेखनातून दिसली असावी; पण तीच आपली वाट आहे, हे अन्य काही कारणांमुळे कळले असावे.

फुटाण्यांच्या 'चरित्रा' च्या आधारे त्या कारणांचा मागोवा घेता येईल. त्या चरित्रातील पहिला महत्वाचा तपशील म्हणजे त्यांची चित्रकलेतील गती, आणि तिच्यातील काही अंगांशी संबंधित असा त्यांचा व्यवसाय. त्यांच्यातील चित्रकाराला समाजाच्या शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक व मुख्यतः राजकीय जीवनांतील व्यंगे अचूक दिसली, आणि ती त्यांनी एखाद्या व्यंगचित्रकाराच्या शैलीतच पण वेगळ्या माध्यमातून टिपली. व्यंगचित्राप्रमाणेच व्यंगचित्ररूप कविताही फार पसरट असून चालत नाही. तिला नेमकेपण हवे, आणि तिच्यात एक ठोसाही हवा – अशा वृत्तीने दिलेला ठोसा की ज्याचा, ज्याला तो दिला त्याला राग येणार नाही. उलट गंमत वाटेल. फुटाण्यांच्या कवितेत हे तिन्ही विशेष आहेत. अर्थात फार राग येऊ नये तशी नुसती गंमतही वाटू नये ! तसे झाले तर त्या व्यंग कवितेचा हेतूच फसेल. राग व गंमत यांच्या सीमारेषांवरील अशी काहीतरी प्रतिक्रिया झाली पाहिजे. हे वाचक श्रोत्यांच्या बाबतीतही खरे आहे. त्यांनाही या कवितांत गंमती पलिकडे काहीतरी जाणवले पाहिजे. जाणवत असेलच. ज्या कवितातून ते जाणवत नसेल त्या कविता तेवढ्या यशस्वी नाहीत असे समजले पाहिजे.

दुसरा महत्वाचा चरित्रात्मक तपशील फुटाण्यांचे हिंदी भाषेचे ज्ञान हा. त्यांनी हिंदीत कविताही लिहिल्या आहेत आणि त्या मराठी कवितांच्या आधीच्या आहेत. फुटाण्यांच्या पहिल्यावहिल्या मराटी व्यंग कविताही इतक्या सफाईदार कशा याचा उलगडा या तपशीलातून होतो. त्या तऱ्हेचे लेखन करण्याचा सराव होताच फक्त भाषा बदलली इतकेच. फुटाणे जेव्हा हिंदीकडून मराठीकडे आले. तेव्हा कवितेचे मराठीपण

त्यांनी जपले हे खरेच, पण तिचा एकूण ढंग मात्र काहिसा हिंदी राहिला. हिंदी श्रोत्यांना चिमट्याची, ठोशांची कविता आवडते. यमके, शब्दांची पुनरावृत्ती श्लेष, काही महत्वाच्या नावागावांशी खेळ अशा अनेक साधनांनी त्या तऱ्हेची कविता लिहीणारे हिंदी कवी श्रोत्यां पर्यंत सहजपणे पोचतात. हिंदी व मराठी श्रोत्यांची नस एकच आहे. हे फुटाण्यांनी ओळखले; आणि त्या ढंगाची मराठी कविता त्यांनी पेश केली. श्रोत्यांना तिचा आशय आवडला, तसा हा ढंगही आवडला. जे त्यांना चटकन कळते असे काहीतरी फुटाणे देतात, त्यात माफक ध्वन्यर्थ असतो. आणि तो फक्त आपल्यालाच कळतो असेही प्रत्येकाला स्वतंत्रपणे वाटते, व एकत्रितपणेही. बारामती, नांदेड इत्यादी स्थलनामातून त्यांना मग वेगळेच ध्वनी ऐकू येऊ लागतात! आणि त्या कवितेत व्यंग्यार्थ तर असतोच. व्यंगाकडून व्यंग्यार्थाकडे जाताना श्रोत्याला कोणत्याही बौध्दिक हालअपेष्टा सहन कराव्या लागत नाहीत. त्यामुळे तो मनापासून दाद देतो.

तिसरा महत्वाचा तपशील म्हणजे 'फुटाण्यांचे चित्रपट' त्या चित्रपटातून त्यांचे सामाजिक राजकीय भान व्यक्त झाले आहे. ते भान व्यक्त करण्यासाठीही फुटाण्यांनी कविता हे चित्रपट निर्मितीहून कितीतरी अधिक स्वयंपूर्ण सुकर माध्यम निवडले असावे त्यातून परिहास केला. परिहास करताना 'परमार्थेन न गृह्यंता वचः असे कविता विषयांना सांगितले पण हा परमार्थ त्यांना व श्रोत्यांना एकाच वेळी समजेल अशी सूचक योजना मात्र केली!

फुटाणे कवितेकडे कसे वळले, आणि त्यांनी विशिष्ट आशयाची व विशिष्ट ढंगाचीच कविता प्रधान्याने का लिहिली, याचा उलगडा या पध्दतीने करता येतो. कारणे कोणतीही असोत आज 'रामदास फुटाणे' हे वाचक श्रोत्यांचे आवडते कवी आहेत, हे निश्चित.

फुटाण्यांचे निरीक्षण चौफेर आहे, आणि त्यांच्या अंगी वेगवेगळ्या विशेषतः राजकीय व साहित्यिक क्षेत्रातील काही गाजलेल्या घटनांबाबत चटकन प्रतिक्रिया व्यक्त करण्याची क्षमता आहे. त्यातून 'चांगभलं' मधील 'प्रासंगिका' तयार झाल्या. या प्रासंगिकांत कवीच्या डोळ्यांसमोर विशिष्ठ व्यक्ती असतात; त्यांच्या संबंधातील एखादा प्रसंग असतो. पण तो विनोदी वा उपरोधीक पध्दतीने प्रासंगिकेत आणताना त्या व्यक्तीसंबंधीचे इतर काही तपशीलही सूचकपणे भरले जातात. त्यामुळे प्रासंगिकेची खुमारी वाढते. 'चंद्रिका', '(तळ) मळीची शाई' अशा काही कवितांची उदाहरणे येथे देता येतील. पहिलीचा संदर्भ राजकीय तर दुसरीचा साहित्यिक. समकालीन घडामोडींशी उडता संबंध ठेवणाऱ्या वाचकालाही चटकन कळतील असे हे संदर्भ. त्यामुळे फुटाण्यांची टिकाटिप्पणी त्याला खूष करते. हा मधल्या वाचकाचा प्रकार. त्याच्या अलिकडे व पलिकडे आणखी दोन प्रकारचे वाचक असतात. 'अलिकडच्या' वाचकाला कवितेचा रोख कळत नाही. त्याची सोय कवितांखाली टिपा देऊन, फुटाण्यांनी केली आहे. आणि 'पलिकडच्या' वाचकासाठी काही आधिक तपशील भरुन त्याचीही दखल घेतली आहे. उदाहरणार्थ 'तिचा प्रत्येक बॉल नोबॉल' असतो या ओळीवरुन 'चंद्रिके' ची एक काळची क्रिकेट कारकिर्द त्याला आठवते; आणि 'गवताला भाले कसे फुटतील ?' सारख्या ओळीतून प्रवरानगर साहित्य-संमेलनाच्या प्रकरणाशी संबंधीत असलेल्या

नाटककाराच्या एक नाटकाचे नाव सुचवले जाते. हे सगळे खुबीदार आहे यात शंकाच नाही.

पण त्यातून निर्माण होणारा प्रश्न असा की, फुटाणेंना यापैकी कोणत्या वर्गातील वाचकाशी विशेषत्वाने संवाद साधायचा आहे ? मधला वाचक महत्वाचा खराच. पण कालांतराने त्या घटनेचे त्याला विस्मरण झाल्यानंतर त्या प्रासंगिकेचे काय होईल ? अलिकडच्या वाचकासाठी दिलेल्या टिपा कालांतराने या मधल्या वाचकासाठी उपयोगी पडल्या तरी टिपांच्या साह्याने घेतलेला आस्वाद थोडा मर्यादितच नाही का होणार ? म्हणून वाटते की, फुटाण्यांनी पलिकडचा तिसरा वाचकच प्राधान्याने डोळ्यांसमोर ठेवला तर ? तो पुरेसा जागरुक असतो; आणि महत्वाच्या घडामोडींबद्दलचे आपले स्मरण ताजे ठेवत असतो; त्या घडामोडींतूनच त्याचा 'दृषटीकोन' सिध्द होत असतो.

फुटाण्यांच्या कवितांचा हेतूही वाचकांचे क्षणिक रंजन करणे हा नसून (अर्थात तरीही गैर नाही) त्याला या घडामोडींच्या संदर्भात एक दृष्टीकोन देणे हाच असावा. तो साध्य होण्याच्या दृष्टीने, जे समकालीन आहे. त्यांची कालसापेक्षता शक्य तेवढी कमी करणे, काही तपशीलापुरतीच मर्यादित ठेवणे, ते कालांतरानेही आस्वादक्षम राहील अशी डूब देणे आवश्यक आहे. आणि कधी कधी केवळ समकालीन घडामोडींवर न विसंबता त्यांच्यातून व्यक्त झालेल्या प्रवृत्ती हाच कवितेचा विषय करणे हेही आवश्यक आहे. फुटाण्यांना ते अवघड जाणार नाही. कारण या सगळ्या घडामोडींबद्दल त्यांना योग्य ते परिदर्शनात्मक भान आहे. 'चांगभल' मधील अनेक कवितांतून ते जाणवते. ते भान या कवितांना त्यांची कालसापेक्षता कमी करण्यात उपयुक्त ठरेल. विविध कलातील गतीमुळे या कवितांना आलेली संदर्भ संपन्नताही या प्रकिरयेला हातभार लावेल. कोणी म्हणेल, हे सगळे कशासाठी ? अखेर या 'प्रासंगिका' आहेत. याला उत्तर असे की, त्या विशिष्ट प्रसंगातून सुचलेल्या म्हणून प्रासंगिका. त्या प्रसंगाबरोबरच विराव्यात अशी अपेक्षा असेल तर मग बातमी व कविता यांच्यात फरक काय उरतो ? प्रासंगिकतेला मर्यादा असतातच पण तिने त्या काही प्रमाणात ओलांडण्यासाठी प्रयत्नशील असणे चुकीचे नाही. फुटाण्यांच्या आवडत्या कोटीक्रमशैलीत असे म्हणता येईल की त्यांचा विनोद-उपहासात 'अप्रासंगिक' असे काही नाही ते निर्मळ आहे. त्याच्या आधारे या प्रासंगिका 'न प्रासंगिक' (a-topical) करता आल्या तर बहार होईल ! फुटाण्यांना ते सहज साधेल; काही ठिकाणी साधलेही आहे.

शिवाय आपली एकंदर परिस्थितीही त्यांना किती अनुकूल आहे. तिच्यात काही 'समकालीन' नसतेच, तपशील बदलून त्याच त्याच गोष्टी घडत असतात - आणि त्या आपल्या अंगात एखाद्या हट्टी रोगासारख्या मुरलेल्या प्रवृत्तींच्या, आपल्या चुकीच्या अग्रक्रमांच्या, आणि क्षीण जीवनमूल्यांच्या निदर्शक असतात. फुटाणे 'चांगभल' म्हणून तेच सुचवतात, पण ते अधिक ठाशीव अधोरेखीत स्वरुपात यावे त्यामुळे कवितात अनुस्युत असलेले विश्लेषणही पुरोगामी येईल, आणि कवितेला एक नवे परिमाण मिळेल. 'सफेत टोपी लाल बत्ती' या संग्रहाच्या प्रास्तविकरुप दोन शब्दात फुटाण्यांनी म्हटले आहे की, ''खरं तर गंभीर जळजळीत लिखाण लेखणीतून पाझरणं आवश्यक असताना धुळवडीतील खट्याळपणाचे रंग फेकण्याचा मोह टाळणे आवश्यक होते''.

मला असे वाटते की फुटाण्यांना या दोहोंचा समन्वय करणे सहज शक्य आहे. गंभीर व खट्याळ हे सूर परस्परव्यावर्तक असतात असे मानण्याचे कारण नाही. आपण तसे मानत आल्यामुळे आपल्या गंभीर व विनोदी अशा दोन्ही स्वरुपाच्या साहित्याचे बरेच नुकसान झाले आहे. फुटाण्यांची प्रकृती मूलतः गंभीर आहे. पण तिला विनोद बुध्दिचेही देणे आहे. समन्वयाला अत्यंत अनुकूल अशा परिस्थितीचा फायदा फुटाण्यांच्या आजवरच्या कवितेला काही प्रमाणात झालाच यापुढे त्यांनी तो अधिक प्रमाणात करुन घ्यावा.

'चांगभलं' मधील कवितांतून फुटाण्यांची समाजवादी निष्ठा, विज्ञान-संस्कृती याबद्दल त्यांनी केलेले चिंतन, भ्रष्टतेबद्दलची त्यांना असलेली चीड हे विशेष अप्रत्यक्षपणे व्यक्त होतात. आणखी एक वेधक विशेष म्हणजे त्यांचे साहित्यावरील विशेषतः कवितेवरील प्रेम. त्या प्रेमामुळे कवितात पुष्कळ वाङ्मयीन संदर्भ येतात. या प्रेमाचा फुटाण्यांच्या कवितेवर अधिक खोल संस्कार होऊ शकेल; शब्दयोजना, छंद इत्यादी काव्यविशेषाबद्दल तिला अधिक आस्था निर्माण होऊ शकेल. जे श्रोत्याला खटकत नाही किंबहुना थेटपणामुळे आवडतेच, ते वाचकाला खटकू शकते. कारण श्रोता तात्पुरता असतो आणि त्याचा आस्वादही तात्पुरताच असतो. वाचक हा कवितेशी दिर्घकाळ संबंध ठेऊ शकतो. त्या संबंधासाठी आवश्यक ते दुवे त्याला शब्दातून छंदातून मिळतात. फुटाण्यांच्या कवितेने या वाचकाचीही दखल घ्यावी असे सुचवावेसे वाटते.

श्रोता किंवा वाचक यांच्याबद्दल अशी एका फटक्यात मावणारी (Sweeping) विधाने करणे योग्य नाही, हे खरेच. कारण दोन्हीकडे अपवाद असतात; आणि वाचक व श्रोता हे परस्परव्यावर्तकही नसतात. श्रोता हा वाचक आणि वाचक हा श्रोता, असेही असते, असावे. पण अलिकडच्या साहित्य हे कथाकथन, कविसंमेलन या माध्यमांच्याद्वारा पोचवण्याच्या उत्साहाच्या काळात श्रोता व वाचक यांच्यातील अंतर वाढत चालले आहे. हे योग्य नव्हे. श्रोत्यांचे रंजन अवश्य करावे; पण त्याबरोबरच त्याच्यातील वाचकालाही साद घालावी. सर्वांशी एकाच वेळी संवाद साधता येत नाही; विभाग पाडणे काहीवेळा अपरिहार्य असते, हे मान्य पण त्या विभागांचा विस्तार करणे व त्यांच्या सीमारेषा लवचिक ठेवणे हे तरी शक्य आहे ?

फुटाण्यांनी प्रासंगिकांच्या काव्य रुपाबद्दल अधिक आस्था बाळगली तर आणखी एक गोष्ट आपोआपच घडेल. ती अशी त्यांच्या काव्य लेखनाच्या प्रयोजनांच्या संख्येत भर पडेल. दंभस्फोट हे महत्वाचे प्रयोजन आहेच; रंजन कदाचित दंभस्फोटातूनच साधलेले आहे. पण फुटाण्यांसारख्या चतुरस्त्र सजग कवीला आणखीही काही साधणे शक्य आहे. ते, फुटाणे सध्या ज्या प्रकारची कविता लिहीत आहेत. त्यातून साधेलच, पण त्यातूनच त्यांना कवितेच्या आणखी काही रुपांकडे जाण्याचीही प्रेरणा मिळेल.

जो भरभरुन देतो, त्याच्याकडून अधिक मागण्याचा मोह व्हावा, हे स्वाभाविकच नाही का ? फुटाण्यांनी अल्पावधीत पुष्कळ दिले, आणि जे दिले ते मनःपुर्वकतेने दिले. 'चांगभलं' हा आपल्या एकंदर परिस्थितीला वरवरचा स्पर्श करण्याचा प्रयत्न नाही. त्यामागे एक अस्वस्थ मन आहे, ते तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न हेरून त्यांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नात आहे. कधी व्याकूळ, अगतिक वाटते; पण तसे काही क्षण सोडले तर या मनाचा एकंदर कल विधायक विचार करण्याकडे आहे. ते पुरोगामी आशावादी आहे. उज्ज्वल

भविष्यकाळासाठीची आपली उपाययोजना ते निर्भिडपणे मांडते. मग ती कोणाला पटो न पटो किंवा ती कितीही वादग्रस्त असो. ती पटावी असा फुटाण्यांचा आग्रहही नाही. त्यांच्या कवितेचा सूर वाचक-श्रोत्यांना पुरेसे स्वातंत्र्य देणारा आणि जे पटेल त्यात सहभागी करून घेणारा आहे. फुटाण्यांना एक उत्तम मैफल जमावायची आहे; एकूण वातावरण नैराश्याचे असले तरी कायमचे निराश होऊ नका, असे सांगायचे आहे; म्हणूनच 'पुजेची थाळी' उचलताना वा 'पेल्याला पेला' भिडवत असताना ते स्वतःसकट सर्वांनाच शुभेच्छा देतात, ''चांगभलं'' !

मला वाटते या शुभेच्छेची आज आपणा सर्वांनाच गरज आहे; म्हणूनच ती देणाऱ्या या कवीलाही आपण त्याच मनःपूर्वक जिव्हाळ्याच्या सुरात म्हणू या, **'चांगभलं'** !

2/2/80

## प्याला उचलताना -

चांऽ ऽ ऽ ग    भलंऽ ऽ ऽ!

चांगलं होवो, भलं होवो या अर्थाचा समर्पक मराठी शब्द. ज्योतिबाची किंवा खंडोबाची पूजेची थाळी उचलतांना भक्त म्हणत असतात - 'चांगभलं' ! प्याल्याला प्याला लावतांना इंग्रजी चिअर्स ऐवजी मराठीत चांगभलं म्हटलं की सॉलिड इंग्रजी किक किंवा मराठीत झटका बसतो.

सकाळी गुडमॉर्निंग ऐवजी चांगभलं म्हटलं कि दिवस कसा ताजातवाना वाटतो. रात्री झोपण्यापूर्वी गुडनाईट ऐवजी चांगभलं म्हटलं कि कित्ती कित्ती सुंदर स्वप्न पडतात. निदान स्वप्नात तरी हा देश आपला वाटू लागतो.

देश आपलाच आहे फक्त स्मगलर आणि गुंड यांचं राजकारणावर वर्चस्व आहे. म्हणून तो कधी कधी आपला वाटत नाही किंवा कधी कधी आपला वाटतो. आहे आपलाच. खरंच आपलाच आहे. या देशात समान नागरी कायदा नसला तरी देश आपलाच आहे.

चालू राजकारणामुळे या देशाचा जो खेळखंडोबा चालला आहे अशावेळी चांगभलं म्हणण्यापलीकडे आपण काय करू शकतो ?

अंतःकरण व्याकुळ होतं. उपाय अपुरे आहेत. प्रश्न अथांग सागरासारखे. कुठं कुठं शिवायचं? सारं आभाळच फाटलं आहे. जोपर्यंत धर्मपिक्षा देश मोठा असं सर्वांना वाटत नाही - हिंदूंना आणि मुसलमानांनासुध्दा - तोपर्यंत आपण फक्त एवढंच म्हणायचं - **'चांगभलं ऽऽऽऽ!'**



**लाल + निळा = जांभळा**
**लाल + पिवळा = केसरी**
**निळा + पिवळा = हिरवा**
**हो, पण हे रंगाचे गुणधर्म राजकारणातसुध्दा**
**दिसायला हवेत काय ? रंग देशाचं,**
**धर्माचं प्रतिनिधित्व करू लागला**
**अन् या रंगीत हायकू जन्माला आल्या**

## लाल

गोर्बाचेवच्या माथ्यावरील
'जांभळा' डाग
गालातल्या गालात हसला.
वेड्याला काहीच कळलं नाही
'निळ्या' मांडीवर
'लाल' कधी बसला.




## निळा

निळा म्हणाला –
''हे 'लाल' !
मी विश्वाचं स्वप्न
तू धरतीचा आकान्त
'निळ्या' पांघरुणाखालीसुध्दा
पुनःपुन्हा तीच भ्रांत''

## पिवळा

अमृतसरच्या मंदिरातील
चिनी रायफल म्हणाली –
'पिवळा' 'हिरव्या'तही असतो,
'पिवळा' 'केसरी'तही असतो.
भाई भाई म्हणत
दोघांनाही पाहून हसतो.



## काळा

आंतरराष्ट्रीय कीर्तीसाठी
जेव्हा 'बगळा' बावळा होतो,
'सोनेरी' घुमटावर
'काळा' कावळा होतो

## पांढरा

'केसरी'ला 'हिरवा'
अतिरेकी वाटतो
'हिरव्या'ला 'केसरी'
अतिरेकी वाटतो.
शोक-चक्राखाली
'पांढरा' मध्येच फाटतो !

दि. ३० एप्रिल १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)

# मैफल

हेगडेंचा 'दरबारी कानडा'
कुठे देवरसांचा 'बागेश्री' आहे
जनमोर्च्याच्या 'धुमाळी'सह
चंद्रशेखरांच्या 'झोप-ताला'त
व्ही. पी. सिंगचा 'रागे-श्री' आहे ।।
संगीतातील घराण्यासारखीच
राजकारणातही घराणी असतात
'वसंत-बहार'
'शंकराभरणम्'
कुठे 'कराडा' घराण्यातील
'यशवंत' गायकीची असतात ।।

३ एप्रिल १९८८



## काय हे – गडे ?

फाटाफुटीच्या संसारात
देवेगौडा नवी सवत आहे
पंजाबात पार्टी फुटली
'कर-नाटक' उसवत आहे
उसवलेल्या गोधडीला
किती टाके घालायचे
अंध-पंगू सोबतीला
याच गतीने चालायचे




*कर्नाटकातही फाटाफूट झाली हेगडेंच्या कारभाराला दृष्ट लागली*
*अतिबुध्दीमान लोक एकत्र आले कि त्याचा 'जनता पक्ष किंवा 'वडा' होतो.*

# चंद्रिका



हॉट टेंपरमुळे
तार लूज होते
ती जेथे जाते
तेथे 'न्यूज' होते
विमानातील पट्ट्याची
महाराष्ट्रात कुजबुज होते ।।
खालच्या हाऊसप्रमाणेच
वरच्या हाऊसमध्येही
सतत बोलत असते
तिचा प्रत्येक बॉल
'नोबॉल' असतो
तरी प्रत्येक 'पीच'वर
ती खेळत असते ।।

दि. ३ मे १९८७

*विमान सुरु होताच 'पट्टा बांधा' असे हवाई सुंदरीने सांगीतले. सुंदर (?) दिसणाऱ्या नामदार कुमारी चंद्रिका केनियांना तो अपमान वाटला. त्यांनी हवाई सुंदरीच्या विरोधात तक्रार नोंदविली. हे भांडण वृत्तपत्रातून खूपच गाजलं.*






## सूर्यफुले

सूर्य
कधी नांदेडवर उगवतो
तर कधी सांगलीवर
इकडून तिकडे पाहतांना
सूर्यफुलांच्या माना अवघडतात
नव्या सूर्योदयास
उशीर झाल्यास
फांदी फांदीवर बडबडतात
खरचं
सूर्यफुलांच्या माना अवघडतात.

दि. १० मे १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*दिल्लीचा कटाक्ष कोणावर आहे हे पाहून कुणाच्या दारात गर्दी करायची हे कॉंग्रेस कार्यकर्ता ठरवित असतो.*

# भूगोल

ते जयपुरहून म्हणाले –
''साखरेच्या गोडीसाठी
मी महाराष्ट्रात येण्यास
तयार आहे.
'सांगली'साठी जेथे पूल असतो
तेथे 'नांदेड'साठी भुयार आहे.''

दि. २४ मे १९८७




*निलंगेकरांना गादीवर बसवून त्यांनी राजस्थानचं राज्यपाल पद स्विकारलं होतं. परंतु निलंगा जाऊन तेथे 'नांदेड' आलं आणि हे अस्वस्थ झाले. 'बारामती' हाताशी धरुन त्यांनी 'नांदेड' ला सुरुंग लावण्याचा खेळ सुरु केला.*

## स्वयंसिध्दा

लोक त्यांना
सिध्दहस्त समजत होते
म्हणून घरादारासह
ते टी. व्ही. त घुसले
टी. व्ही. बंद करीत
काहींनी स्वतःचे
तर काहींनी
इतरांचे डोळे पुसले ।
'पाल्यां'च्या नावाचा
सर्वत्रच गजर होता
परंतु तेथे
'रजनी'ची वेणी नव्हती
'वपुं'चा गजरा होता

दि. ३१ मे १९८७




*व.पु. काळे यांनी सादर केलेला दूरदर्शनवरील 'गजरा' फसला. नंतर दूरदर्शनवर आलेली 'स्वयंसिद्धा' ही मालिकासुद्धा प्रेक्षकांच्या मनाची पकड घेऊ शकली नाही.*

*ट्रान्स्पोर्ट चा संप चालू होता. जीवनावश्यक वस्तू मिळणें कठीण झाले. रस्त्यावरील ट्रक वाहतूक बंद पडली होती. शेवटी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी जकात रद्द करण्याचे आश्वासन दिले. ट्रक वाहतूक सुरु झाली.*



## जैत रे जैत

शंकर बनात
सचिवालयात
प्रत्येकाची मान हलली
म्युनिसिपालिटीची नार
डोळे मोडीत चालली
"मी रात टाकली
मी कात टाकली
मी लक्ष लक्ष
रुपयांची
जकात टाकली"

दि. ६ जून १९८७

*जकाती विरोधी महाराष्ट्रात प्रचंड आंदोलन सुरु झाले. तेव्हा अशीही एक जकात वसुली.*

## जकात

ती म्हणाली –
"आज ऑफिसला
उशीर होतोय
जकात बंद"
ओठांवरून जीभ फिरवीत
स्वारी दारापर्यंत गेली
अन्
उंबरठ्याच्या आतच
त्याने
जकात वसूल केली !



दि. १४ जून १९८७ (जत्रा)

## अर्थ संकल्प

ज्यांना 'पूज्य' समजत होतो
त्यांनी
'शून्या'वर आधारितच
सादर केला
महाराष्ट्राचा गाडा
'भूगोला'कडून 'खगोला'कडे नेला
विकासाचा 'गोलमोल' चंद्र
आकाशात लोंबकळत आहे
इकडे मात्र धरणीमाता
दुष्काळाच्या खाईत होरपळत आहे

दि. १४ जून १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*शून्यावर आधारित अर्थसंकल्प म्हणजे नेमकं काय ते सामान्य लोकांना कळलं नाही. मात्र खर्चात कपात झाल्यामुळे आमदार सुद्धा 'शून्य' चेहऱ्याने एकमेकाकडे पाहात असत.*

# डोकं

तिनईकर म्हणाले
"ब्राह्मणांनी
डोकं वापरलं पाहिजे"
अनेकांनी खिशातील हात
वर नेले
परंतु ते तर
पाटलाच्या घरी होतं
महिन्याचं पाकिट
प्रत्येकाच्या करी होतं

दि. २१ जून १९८७ (लोकसत्ता, मुंबई)



*ब्राह्मण सभेत मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त श्री. तिनईकर यांनी भाषण केले. त्यातील अेक ओळ होती – 'ब्राह्मणांनी डोकं वापरलं पाहिजे'*

*केवळ पैशासाठी भारत सोडून दुसऱ्या देशाचं नागरिकत्व स्विकारण्याची इच्छा जर एका साहित्यिकांच्या मुलाला होत असेल तर गरीब, दलित, भटके यांच्या मुलाकडून देशभक्तिची अपेक्षा का करावी?*

## 'कंट्री'

अमिताभचा भाऊ
मागतो खाऊ –
"भारत सोडून
स्वीत्झर्लंडला जाऊ
जाताना सगळे
डॉलर घेऊ
बँकेत भरून
तेथेच राहू
तेथूनच 'इंडिया'ची
गंमतजंमत पाहू "
हरिवंशराय बच्चनची
'मधुशाला' ओस पडली
'स्कॉच'च्या बाटलीपुढे
'कंट्री' ढसा ढसा रडली




दि. २८ जून १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*केवळ आपली शक्ति - किती लोक ट्रकने आणू शकतो ती - दाखविण्यासाठी राजीव गांधींनी मार्गदर्शन करावं (?) म्हणून पुण्यात गाडगीळ पवार आणि कं. चा मेळावा भरला होता. क्रिकेटच्या मैदानावर शेवटी मेळाव्यातून काय निष्पन्न झालं ते क्रियाशील सदस्यांनासुद्धा कळलं नाही. खेळपट्टी मात्र खराब झाली.*

## खेळपट्टी



पुण्याच्या मेळाव्यासाठी
त्यांनी खेळपट्टी मोडली
तेव्हा -
स्टम्प्सच्या गळ्यात पडून
बॅट मुसमुसत रडली
गटबाजीचे चेंडू
एकमेकांना मारीत असतात
अन् असेंब्लीची खेळपट्टीसुध्दा
अशीच खराब करीत असतात

दि. ५ जुलै १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*प्रवरानगर येथे होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणूकीत वसंत कानेटकरांनी उमेदवारीचा अर्ज मागे घेतला होता. परंतु आनंद यादव अध्यक्ष होऊ नयेत या उदात्त (?) हेतुने गंगाधरपंत गाडगीळ यांनी तो अर्ज तसाच खिशात ठेवला. श्री. द. मा. मिरासदार यांनीही दुसऱ्यांदा अर्ज मागे घेतला होता.*

## (तळ) मळीची शाई

प्रवरानगरच्या सोसायटीचा
एक सदस्य दुसऱ्याला म्हणाला
'यादवी' युध्दाचा 'आनंद'
सर्वत्र सारखाच असतो
मग हा 'इंट-लेक-च्युअल'
साखर पाहून का हसतो ? ।।
काहींची 'मिरासदारी'
'द. मा.' होऊन धापा टाकते ।।
जुन्या घोड्याच्याच मागे
पुन्हा पुन्हा टापा टाकते ।।
एका धमकीतच
कलमबहाद्दर असे तुटतील
तर
गवताला भाले कसे फुटतील ?
आज ना उद्या कधीतरी
मळी ची शाई होऊन
ऊसालाही लेखण्या फुटतील




दि. १२ जुलै १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

# रंगमंच

आपण बालगंधर्व आहोत
असं अनेक पाटलांना वाटायचं
त्यांचं मन
महाराष्ट्रात मिशीला पीळ द्यायचं
अन् दिल्लीने बोलविताच
लुगडं नेसून जायचं
मुरडत मुरडत गायचं –
'नाथा, आले मी डोलत...'

दि. १९ जुलै १९८७ (लोकसत्ता, मुंबई)




*इतिहासात मराठी मातीचा टिळा लावून मराठा अटकेपार गेला होता आज दिल्लीचं लेबल लावून तो महाराष्ट्रात आयात केला जातो.*

*पं भीमसेन जोशी यांच्या संगीतावर प्रत्यक्ष गायन चालू असतानाच हुसेन पेंटींग करणार होते. एन्.सी.पी.ए.च्या थिएटरमध्ये रसिकांनी खूपच गर्दी केली होती. हे पेंटींग तयार होण्यापूर्वीच पाच लाखाला विकले गेले होते. परंतु प्रत्यक्षात पेंटींग कार्यक्रमाच्या मध्यंतरानंतर बिघडत गेले. संपूर्ण कॅनवासवर क्रीमझन फेकीत पेंटींग पूर्ण झाले. रसिकांनी टाळ्या वाजविल्या आम्ही कपाळावर हात मारुन घेतला.*

## भरवशाच्या म्हशीला ---

हिऱ्यामाणक्यांचे राग
भीमसेन यांच्या उशाला
क्रीमझनच सारवायचा होता
तर मग हुसेन कशाला ?

*'जयपूर' चं राज्यपाल पद चालू असलं तरी त्यांचा बहुतेक वेळ महाराष्ट्रातच जात होता. त्यांची काठी कोणत्या दिशेला हालते यावरुन महाराष्ट्रात राजकारण बदलत होतं.*

## भूक

सांगलीच्या माळरानावरील
एक गुराखी दुसऱ्याला म्हणाला –
"आजकाल लोक
उच्चपदाचा पगार घेऊन
मेंढ'पाला'चंच काम करतात
वाळवंटाला कंटाळून
'हिरव्या' चाऱ्याचाच मार्ग
धरतात"
दुसरा म्हणाला –
"आपला 'कळप' सुखी
असावा
असं कुणाला वाटत नसतं ?
दोन थेंब दुधासाठीच
वासरू गाईला चाटत असतं

दि. २ ऑगस्ट १९८७ (लोकसत्ता, मुंबई)



*साहित्य संमेलनाचा वाद विकोपाला गेला होता तर पुणे विद्यापिठातील भ्रष्टाचाराचे प्रकार रोज उघडकीस येत होते.*

## नवे अतिरेकी

संमेलनाच्या रणांगणावर
बुध्दिवंतांचे युध्द आहे
साहित्यिकांच्या प्रदूषणामुळे
आज 'गंगा' अशुध्द आहे
विद्यापीठातील भ्रष्टाचार पाहून
कुलगुरुसुध्दा लाजले आहेत
सरस्वतीच्या मंदिरात
नवे अतिरेकी माजले आहेत

दि. ९ ऑगस्ट १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*नव्या मंत्रीमंडळाच्या वाढीस दिल्लीची परवानगी मिळत नव्हती. तरी सुद्धा मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण एका कोऱ्या कागदाची घडी दिल्लीला घेऊन जात तेव्हा अनेकांच्या आशा पल्लवित होत.*



## विस्तार

ते फक्त एवढंच म्हणाले –
''नव्या यादीत तुमचं नाव
आहे''
हे 'सांगली'च्या गाडीतून
उतरले
पुन्हा 'नांदेड'च्या गाडीत बसले
हात जोडून हसले –
''साहेब, आईशप्पत
स्थिर सरकार हवं आहे''

दि. १६ ऑगस्ट १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

## व्यथा



नऊ ऑगस्टमुळे
पंधरा ऑगस्ट दिसला
पंधरा ऑगस्टमुळे
सव्वीस जानेवारी दिसला
तरी चाळीस वर्षांपासून
प्रजासत्ताक हरवला आहे
व्यक्तिसत्ताक पुष्पचक्र पाहून
स्मृतिस्तंभ गहिवरला आहे

दि. २३ ऑगस्ट १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*एका व्यक्तिभोवतीच राजकारण फिरु लागलं. लोकशाही गाडली गेली. पक्षातील लोकच अस्वस्थ झाले परंतु मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार?*

*त्यांना सांगितलं होतं कि – 'शंकररावांना आम्ही दिल्लीत घेणार आहोत.' परंतु प्रत्यक्षात त्यांना न घेता राज्यपाल श्री. शंकरदयाळ शर्मा यांना उपराष्ट्रपती पदासाठी दिल्लीत घेतलं. शंकरराव चव्हाण येथेच राहिले. तेव्हा बारामतीकर अस्वस्थ झाले.*

## 'शरदा'चे चांदणे



हा शंकर इथेच
गेला वर दूजा
मोरगावच्या गणपतीची
करा आता पूजा
'पाऊसही कोसळला
आता कसं भांडायचं ?
'नांदेड'च्या उखळातच
किती दिवस कांडायचं?

दि. ३० ऑगस्ट १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

# तडीपार

महाराष्ट्रातील तडीपार
कल्याणलाच जमत असतात
गुन्हेगारांना आवरताना
कल्याणचे पोलीस दमत असतात.
आता साहित्य संमेलनसुध्दा
कल्याणलाच भरणार आहे
बंधुप्रेमाच्या भेटीपुढे
कोण काय करणार आहे ?

दि. १३ सप्टेंबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)



*साहित्य संमेलन कल्याण येथे व्हावे म्हणून चर्चा सुरु झाली.*

# हरि हरि



'व्ही. पी.' चे
'व्ही. आय. पी.' होताच
रथी महारथी जागे झाले ।
जे 'ओनली' होते
ते 'लोनली' होऊन
थरथरत मागे आले ।
स्वीस बँकेचं खातं
कोणा कोणाला धूळ चारील ?
'हरि', यांना तूच सांग
'बन्सी' वाजवीत
'भजन' करणारांना
कोण आता तारील ?

दि. २० सप्टेंबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*अर्थमंत्री व्ही.पी. सिंग यांचा रोखठोक कारभार अनेक उद्योगपतींना अडचणीचा वाटू लागला. काँग्रेसचेच खासदार मंत्री व्ही.पी.सिंग यांच्यावर नाराज झाले. हरियानात सुद्धा बन्सीलाल भजनलाल यांची उलथापालथ चालू होती.*

*कल्याण ऐवजी ठाणे येथे साहित्य संमेलन घेण्याचे ठरले.*



## शंकानिरसन

कल्याणची गाडी
ठाण्याला आली
आमचीच कविता वाचून
हसू आलं गाली
'तडीपार' समजत होतो
ती 'मेंटल केस' निघाली.

दि. ११ ऑक्टोबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

## कुंकू

नांदेडच्या भागाकारासाठी
त्यांनी बारामतीशी गुणाकार केला
आता मात्र रजा घेऊन
वजा होण्याचाच प्रकार केला
बेरजेच्या राजकारणाचं
सारचं गणित फसलं आहे
पदरात बॉम्ब घेऊन
खाली घरचंच माणूस बसलं आहे

दि. १८ ऑक्टोबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*शंकररावांना महाराष्ट्रातून हटविण्यासाठी दादांनी राज्यपालपदाचा राजीनामा दिला. बारामतीकरांना जवळ केलं. परंतु जवळचीच काही माणसं दिल्लीला वेगळचं काही सांगत होती.*

# सन्नाटा

ते येत नाहीत
हे जात नाहीत
तरी प्रत्येकाच्या नावाचा
दिल्लीपर्यंत बोभाटा आहे
स्फोट होण्यापूर्वीचा
भयानक सन्नाटा आहे.

दि. २५ ऑक्टोबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)




*सचिवालय थंड पडलं होतं. नेतृत्वात बदल होईल असं अनेकांना वाटत होतं. कामावर कुणाचंच लक्ष नव्हतं.*

## पॉवर

XX बुवा
सरकारी कमिटीशिवाय
जगू लागले
तेव्हा सचिवालयातील ड्रायव्हर्स
आश्चर्याने बघू लागले
'सरकारी संतां'ना कधी
अशी पाळी आली नाय
सत्यसाईच्या अंगाऱ्याची
पॉवर कमी झाली काय ?

दि. १ नोव्हेंबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)




*छत्रपती शिवाजी महाराज गोब्राह्मण प्रतिपालक होते.*
*सचिवालयात गाई पाळणे शक्य नव्हते........* ***XX*** *बुवा*
*असेच सरकारी संत होते. सरकारी कमिटीवर राहून बंगला, गाडी, टेलिफोन वापरणारे.*
*सत्यसाईचे भक्त असून सुद्धा अेकविसाव्या शतकाकडे देश प्रगती करीत आहे याचे उत्तम गोडवे गात असत.*

*वन डे क्रिकेट सर्वत्र गाजत होतं. त्याच वेळी दादा शेतकरी संघटना काढून शंकरराव चव्हाण यांच्या शासनावर दबाव आणीत होते.*



## मॅच

दादा म्हणाले
'ही विकेट पाडण्याची
मी हमी देतो
दबाव तंत्र वापरलं
की रनरेट कमी होतो.'

दि. ८ नोव्हेंबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*चव्हाणांचे मंत्रीमंडळ पाडण्यासाठी नवीन नवीन प्रयोग सुरु झाले. शेतकऱ्यांच्या पोरांनी चाळीस वर्षे सत्ता भोगल्यानंतर शेतकऱ्यासाठी संघटना काढली.*



## 'हार' - जीत

शेतकऱ्यांच्या नावावर
जगणारा देश आहे
सत्तेच्या भोगासाठी
संन्याशाचा वेष आहे
फुलांच्या हारामध्ये
गटबाजीचा व्देष आहे

दि. २२ नोव्हेंबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*कै. काकासाहेब गाडगीळ यांचे चिरंजीव नामदार बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांनी पुण्याच्या एका समारंभात ऐन वेळी कात्री न सापडल्यामुळे मेणबत्तीने फीत कापण्याचा नवीन प्रयोग केला. परंतु त्यामुळे विषारी गॅसचे फुगे पेटले. गाडगीळ यांना अनेक दिवस हॉस्पीटल मध्ये राहावे लागले.*




## संगत

खानदानी फीतकापू ने
कात्री ऐवजी मेणबत्ती लावली
तेव्हा फुग्यांची माळ
साऱ्या अंगाला चावली -
'विठोबा,
पहिलवानांची संगत नडली
'काकांची अब्रू' कॉटवर पडली'

दि. २९ नोव्हेंबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

## गोठ्याकडे

सत्तराव्या वर्षी
त्यांनी लंगोट लावला
दंड थोपटला शड्डू ठोकला
तेव्हा एका शेतकऱ्याने
बांधावरच शेवटचा झोकला –
"असं कसं कवतीक झालं
चुकलेलं वासरु घरला आलं"

दि. ६ डिसेंबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)

*शंकररावांच्या विरोधात दादा उभे राहिले. त्यांनी राज्यपाल पद सोडलं.*

# नेतृत्व

'नामांतर' विझत असतानाच
'रामायण' पेटलं
तेव्हा 'पँथर'चं बछडं
'महासंघा'च्या शिंगराला भेटलं –
'लई नवस झालं ;
तवा कुठं नेत्यांना
सुगीचं दिवस आलं'

दि. १३ डिसेंबर १९८७ (लोकसत्ता, मुंबई)



*दलित नेते सरकारी कमिट्यावर नेमले गेले होते. त्यामुळे चळवळीची धार कमी झाली होती. फाटाफूट होतीच. नामांतराचा प्रश्नही लोक विसरत चालले होते तोच माधवराव गडकरी यांनी 'रीडल्स' वर लेख लिहिला आणि दलित नेत्यांची नावे पुन्हा वर्तमानपत्रातून दिसू लागली.*

*लक्षद्विपावर पंतप्रधान सहली साठी गेले होते. तेथे त्यांनी एका जखमी देवमाशाला वाचविले. वर्तमानपत्रातून पहिल्या पानावर ही बातमी आली.*



## मागणी

त्यांनी देवमाशाला वाचविले
तेव्हा पंजाबातील
एक निरपराध मृतात्मा
चित्रगुप्ताला म्हणाला -
"देवा, वहीतील जागा खोडा
पुढील जन्मी समुद्रातच सोडा"

दि. १० जानेवारी १९८८ (लोकसत्ता, मुंबई)

*दहा वर्षात जिल्हा परिषदांच्या निवडणूका झाल्या नाहीत. काही ठिकाणी तर गेली तेरा वर्षे प्रशासकच आहेत. न्यायाधीशाकडून स्थगिती मिळविणे ही नवी नीती भारतीय राजकारणात सुरु झाली.*



## लग्न

वरातीचा घोडा सुध्दा
तबेल्यातच लाथा झाडीत असतो
मांडवात जाण्यापूर्वीच
साखरपुडा मोडत असतो
‘झेड. पी.’ चा नवरदेव
पुन्हा बाशिंग सोडत असतो.

दि. ३१ जानेवारी १९८८ (लोकसत्ता, मुंबई)

*अेम.जी.आर. च्या विवाहित पत्नीपेक्षा जय ललितानेच तामीळनाडूच्या राजकारणावर वर्चस्व प्रस्थापित केलं.*



## जय ललिता

चारीमुंड्या चीत करून
नंबर एकला पाणी पाजत असते
संपत्ती काय पत्नी काय
नंबर दोनचीच गाजत असते

दि. ७ फेब्रूवारी १९८८ (लोकसत्ता, मुंबई)

# शिक्षा

कप्तान असूनसुध्दा
तो भलताच स्वच्छंदी आहे
खुंटीवर टांगली तरी
कर्नलची बॅट आनंदी आहे
घटस्फोटाऐवजी
वैवाहिक जीवन जगण्याची
त्याला सहा महिने बंदी आहे

दि. १४ फेब्रुवारी १९८८ (लोकसत्ता, मुंबई)




*दिलीप वेंगसरकरचं उपनाव आहे 'कर्नल'. संघातून त्याला काढून न टाकता सहा महिने खेळण्याची बंदी केली होती.*

# शांता हुबळीकर

‘आता कशाला कालची बात ?’
म्हणत
ती आजची रात्र जागत होती
उद्याच्या दिवसाला
शांत भविष्यकाळ मागत होती
तोच ‘चौफेर’ हिंडणारा
कुणीतरी भेटून गेला
पुन्हा फुलांच्या गुच्छामधून
सोनेरी भूतकाळ खेटून गेला

दि. २८ फेब्रुवारी १९८८ (लोकसत्ता, मुंबई)



*‘माणूस’ चित्रपटातील ‘आता कशाला उद्याची बात?’ गाणारी नायिका शांता हुबळीकर अनेक वर्षे अज्ञातवासात असतांना लोकसत्ताचे संपादक श्री. माधव गडकरी यांनी त्यांचा शोध घेऊन ‘चौफेर’ मध्ये त्यांच्यावर लेख लिहिला. मराठी चित्रपट रसिकांनी पुन्हा शांता हुबळीकर यांचा जाहीर सत्कार गौरव करण्यास सुरवात केली.*

*दूधाचे भाव वाढले. महाराष्ट्र पेटला असं वर्तमानपत्रांना वाटलं. खरं पाहिलं तर मुंबई किंवा पुण्याच्या लोकांनी दूध-रॉकेल-साखर हे तीन विषयच महाराष्ट्र पेटविण्यासाठी आतापर्यंत उपयोगात आणले आहेत. ही आहे मध्यमवर्गीय पुणेरी प्रतिक्रिया.*

## भाववाढ

ते म्हणाले –
"वेटर !
एक पेग दूध
वुईथ वॉटर"

१३ मार्च १९८८.

*मिरवणूका हा भारतीय लोकांचा आवडता भाग. कधी लग्नाची वरात तर कधी धर्माच्या नावावर. राज्य कारभार चांगला करण्यापेक्षा, भ्रष्टाचार नष्ट करण्याऐवजी जनतेला काय आवडतं हे पाहून पंतप्रधानांनी सुद्धा दांडीयात्रा पुन्हा काढली.*



## विनंती

त्यांनी दांडीयात्रा काढून<br>
पुन्हा इतिहासाचे दर्शन दिले<br>
जनतेला खुश केले<br>
कृपया त्यांनी दाखवू नये<br>
भगतसिंग राजगुरू कसे गेले ?

२७ मार्च १९८८.

बोफोर्सच्या दलालीतील एक नाव. आयुष्यात 'शॉर्टकट' नें जाणारी ही मंडळी. राजकारणातही यांचाच मान सन्मान असतो. प्रामाणिक जगणं जेव्हा सतत पराभूत होतं तेव्हा असाही विचार मनात येतो.



## मार्ग

संतांना लाथाडून
गुंडापुढं लीन व्हावं
रोज पराभूत होण्यापेक्षा
छड्डा होऊन 'विन' व्हावं

*८ मे १९८८.*

# औरंगाबाद

मोहरमचा वाघ समजून
त्याला पाहून हसत होते
आपआपल्या अड्ड्यावर
गटबाजी चोळत बसत होते ।।

अनेकांच्या तोंडांना त्याने
काळा रंग फासला आहे
हे तर फक्त शेपूटच
वाघ 'झेड. पी.'त बसला आहे ।।

समान नागरी कायद्याचा
हा सर्व खेळ आहे
'आरिफ महंमद' तयार करा
अजून खूप वेळ आहे ।।

१५ मे १९८८



*औरंगाबाद महानगर पालिका शिवसेनेच्या ताब्यात जाईल इतके नगरसेवक निवडून आले. शिवसेनेकडे कधीच गांभीर्याने पाहिलं गेलं नाही. यांच्या मुळाशी 'समान नागरी कायदा' आहे याचा नेहमी विसर पडतो. परंतु भविष्यात ही भगवी लाट थांबवणे अशक्य होईल. मुस्लीम बांधवांनीच धर्मापेक्षा देश मोठा या वृत्तीने 'समान नागरी कायद्याची' मागणी करणे आवश्यक आहे. परंतु सांगणार कोण? आरिफ महंमद खरं बोलले तर पंतप्रधान श्री राजीव गांधी यांनी त्यांनाच मंत्रीमंडळा बाहेर फेकलं.*



# पुणे

ज्ञानी सत्तेचे भाट झाले
पहिलवान बारमध्ये शिरले
लक्ष्मीच्या आक्रमणापुढे
सरस्वतीचे दास हरले ।।
एकावर एक फ्लॅट उभे
वाडे पायाखाली पुरले
उत्सव किंवा दंगलीसाठी
गणपतीपुरतेच पुणे उरले ।।

२२ मे ८८ लोकसत्ता

*पुण्यात दगडू हलवाई गणपतीवर एका मुसलमानाने विष्ठा टाकली. पुण्यात लगेच दंगल झाली. प्रत्येक गणेशोत्सवावर दंगलीचे सावट असतेच.*

*दिल्लीहून आलेल्या काँग्रेसच्या निरिक्षिका श्रीमती शीला कौल या मुंबईला आल्या तेव्हा -*



## कौल

'शीला'ला 'कौल'
लावून
त्यांनी विचारलं -
"हे जातील ?"
"ते येतील ?"
कौल न देता
तिने 'गंमत जंमत'
केली
हळू हळू 'चंद्रिका'
अस्ताकडे गेली ।।

५ जून ८८ लोकसत्ता

*मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी हा गुंडांचा अड्डा आहे असं नामदार कुमारी चंद्रिका केनिया यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. लगेच गुंडांनी त्यांच्या घरात घुसून त्यांच्या फर्निचरची मोडतोड केली. त्याच वेळी केनिया बाईंनी 'हमलोग' नावाचे खाजगी प्रतिष्ठान ही काढले होते.*



## चंद्रिका

कपाळावर
लाल कुंकु येण्यापूर्वीच
माथ्यावर लाल दिवा आला की
संयम सुटतो जीभ सुटते
बी. पी. सी. सी.
कधी गुंडांचा अड्डा
तर कधी 'हमलोग'चा खड्डा वाटते

५ जून ८८ लोकसत्ता

*श्री. शरद पवार हे गीतेवर हात ठेऊन कधीच मंत्रीपदाची शपथ घेत नाहीत.*
*मात्र कै. वसंतदादा पाटील यांच्या अस्थिविसर्जनाचे वेळी त्यांनी सर्व धार्मिक विधी केले.*
*अनेक नद्यांवर समारंभपूर्वक अस्थिविसर्जन केले.*

## मुखवटे

गांभीर्यपूर्वक शपथ घेताना
ते पुरोगामी असतात
विधीपूर्वक अस्थिविसर्जन करताना
ते व्यवहारी असतात
प्रसंगनिष्ठ मुखवट्यावरच
मतदारांचीही मर्जी असते
म्हणूनच –
रोज बदलणाऱ्या मुखवट्यांची
नेत्यांनाही ॲलर्जी नसते ।।

दि. १६ एप्रिल १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)

*काही 'नमुने' बरोबर घेऊनच श्री. व्ही.पी. सिंग यांनीही नवा प्रवास सुरु केला आहे. त्यात विद्याचरण शुक्ला आहेत तर घराणेशाहीच चालविणारे श्री. देवीलाल सुद्धा आहेत.*




## तेथेही -

भ्रष्टाचार निपटण्याच्या
त्यांचाही मार्ग चुकला आहे
कारण
व्ही. पी. सिंग बरोबरच
विद्याचरण शुक्ला आहे.

दि. २३ एप्रिल १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)



## बहुरूपी

ते जेथे जातात
तेथील फेटा बांधतात
कारभारातील उणीवा
वेषभूषेने सांधतात
'हमे देखना है' म्हणताच
डोळे जळजळतात
तरीसुध्दा
भारतातील इतके आदिवासी
यांच्याचमुळे कळतात

दि. ७ मे १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)

*पंडित जवाहरलाल नेहरु, इंदिराजी आणि आता राजीव गांधी ही सर्व मंडळी आदिवासी बरोबर नृत्य करण्यात पटाईत.*

*यशवंतराव मोहितेंनी त्यांचेच बंधु श्री. जयंतराव भोसले यांची कृष्णा सहकारी साखर कारखान्यावरील सत्ता संपुष्टात आणली. वर्तमान पत्रांनी त्यांचं कौतुक केलं. परंतु महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात तसा काहीच बदल झाला नाही. एक भाऊ जाऊन दुसरा आला.*



## तृष्णा

'पंचगंगे'च्या गळ्यात हात टाकीत
सांगलीचा 'शेतकरी' म्हणाला –
" 'कृष्णा' ! 'कृष्णा' !!
आमचीसुध्दा तीच तृष्णा
तीच गंमत इथे करू
'प्रवरे' काठी गोफ धरू "

डोईवरचा 'माठ' पाहुनि
गोपी संगे कृष्ण भांडला
'नद्या' काठी खेळ मांडला
माठ 'मळी'चा तिथे सांडला

दि. १४ मे १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)

# सिग्नल

त्यांनी ‘पुणे-अहमदाबाद’ एक्सप्रेसला
हिरवा कंदिल दिला
अन् दिल्लीचा दिवा पाहिला -
‘लाल’ चालू नसला तरी
‘हिरवा’सुध्दा मंद होता
‘पिवळ्या’वरच टांगत ठेवण्याचा
दिल्लीचा छंद होता

२१ मे १९८९ (जत्रा)



*पुणे रेल्वे स्टेशन वरुन नव्याने सुरु झालेल्या पुणे अहमदाबाद एक्सप्रेसचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी केले. त्यांनी गाडीला हिरवा कंदिल दाखविला. दिल्लीने मात्र त्यांना मुख्यमंत्री केले तरी संपूर्ण अधिकार कधीच दिले नाहीत.*

*राज्याला टाळून ग्रामपंचायत थेट दिल्लीशी जोडली गेली. जेथून चेक येतात माणूस त्यांचाच दास होतो.*

## आली का पंचाईत ?

प्रादेशिक नेतृत्वाची
शोकसभा आली
पंचायत समितीची
लोकसभा झाली
आमदार नामदार
अचानक 'झीरो' झाले
गल्लीवाले दिल्लीमध्ये
डायरेक्ट 'हीरो' झाले
विमानात 'झेड. पी.'
वेशीबाहेर राज्यपाल आहे
प्रादेशिक नसबंदीची
ही नवी चाल आहे



दि. २१ मे १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)



## संधी

विधानसभेच्या सुवर्णमहोत्सवात
अनुल्लेखाने मारले
तरी विमानाने सांगलीला गेले
जेव्हा ते खरोखरच वारले
मतदारांच्या मनात
सहानुभूती भरता येते
अन् आजकाल अंत्ययात्रासुध्दा
'कॅश' करता येते ।।

३० मे १९८९ (जत्रा)

*विधान सभेच्या सुवर्ण महोत्सव समारंभात वसंतदादा पाटील समोर बसले होते. परंतु पंतप्रधान राजीव गांधी व मुख्यमंत्री शरद पवार यांनी त्यांच्या नावाचा उल्लेख करणे जाणून बुजून टाळले होते. नंतर त्यांचे निधन झाले तेव्हा दोघेही सांगलीला गेले होते.*

# तयारी

रंगीबेरंगी – उघडली दुकानं
काही दुकानी – तेंदूची पानं
पानं घेऊन – वळा बिड्या
धूर सोडून – बांधा माड्या
माड्यावर माड्या – बत्तीस माड्या
आदिवासींना – नऊवार साड्या
उघड बाटली – सोडा खोल
तळागाळाचा – जयजय बोल
पंचायत राज्याचा – वाजतो ढोल
राजा उडाला उंच – जनता खोल खोल

दि. ११ जून १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)



*निवडणूक जवळ आली. राजीव गांधी यांनी पंचायत राज्याचे, जवाहर योजनेचे ढोल वाजवायला सुरवात केली. व्ही.पी. सिंग यांनी तेंदूच्या पानाचा प्रश्न हाती घेतला. मतदार आहे तिथेच आहे. खोल. खोल.*

*जगावर ईस्लामचं राज्य आणण्याचं स्वप्न पाहणारा खोमेनी वारला. आणि आमच्या निधर्मी राज्याने तीन दिवसाचा दुखवटा पाळला. फक्त भारतातच हिंदूचं राज्य यावं अशी स्वप्न पाहणारे विज्ञाननिष्ठ स्वातंत्र्यवीर सावरकर मात्र सरकारी फायलीत काळ्या यादीतच राहिले.*




## मुखवटा

निधर्मी राज्याचासुध्दा
वेगवेगळा मुखवटा असतो
जेथे सावरकर प्रतिगामी ठरतात
तेथे खोमेनीसाठी दुखवटा असतो.

दि. १८ जून १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)

*फक्त वाटप बरोबर झालं तर भ्रष्टाचाराबद्दल या देशात कुणाचीच तक्रार नसते.*

## वाटप

अंतिम सहीचे
परिपत्रक वाचले
दोनशे पंच्याऐशी भूखंड
हातात हात घालून नाचले
'आता आपण सुटणार
आपल्या देहाला
उंच उंच इमारती फुटणार'
त्यांना वाटलं – जिंकली
तोच दिल्ली शिंकली –
'असं मुळीच चालायचं नाय
खाली चारला. वरचं काय ?'

दि. २५ जून १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)

*क्रांती ने साम्यवाद आला. आता चीन मध्ये साम्यवादात क्रांती येत आहे. बिजींगच्या रस्त्यावर विद्यार्थी आला. त्याने अहिंसेचा मार्ग स्विकारला आणि चीन ची सत्ता हादरली.*



## चीन

नव्या क्रांतियुध्दामध्ये
विद्यार्थी कधी दमणार नाही
'विळा' म्हणाला 'हातोड्या'ला
तुझं माझं जमणार नाही !

दि. २ जुलै १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)

*दूरदर्शनवरची तीच ती भाषणे ऐकून कंटाळा आला. परंतु त्यांना कोणी सांगायचं?*



## संयम

त्याच त्याच घोषणांना
मतदारही विटतो
विरोधकांना विझविण्यासाठी
प्रत्येक सभेत 'अग्नि' पेटतो
हमे देखना है –
किती दिवस हे चालणार आहे
आपलाच टी. व्ही. न फोडता
दर्शक किती संयम पाळणार आहे

दि. ९ जुलै १९८९ (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई)

# परिषद

माधवराव म्हणाले -
'ती जागतिक आहे'
गोविंदराव म्हणाले -
'ती अगतिक आहे'
आम्ही म्हणालो -
'फुकट ती मिळाली तर
खरोखरच प्रागतिक आहे'

ऑगस्ट १९८९



*लोकसत्ता चे संपादक श्री. माधव गडकरी हे जागतिक परिषदेचे कार्याध्यक्ष झाले. महाराष्ट्र टाईम्स चे संपादक श्री. गोविंदराव तळवळकर यांनी या परिषदेस झोडपणारा अग्रलेख लिहिला. या परिषदेचे अध्यक्ष मुख्यमंत्री श्री. शरद पवार हे दोघांचेही 'आशास्थान' होते.*

*कोणत्याही मुख्यमंत्र्याला संपूर्ण सत्ता द्यावयाची नाही. सतत मंत्री मंडळात बदल करुन अस्थिरतेची 'टांगती तलवार' त्यांच्या डोक्यावर ठेवायची. अशा परिस्थितीत मुख्यमंत्र्यांची जी अवस्था असते ती*



## नेता

मुख्य आहे परंतु नेता नाही
जिंकला परंतु जेता नाही
दिल्लीच्या इशाऱ्यावर
रात्र रात्र जागत आहे
लग्नाची असूनसुध्दा
म्होतरासारखी वागत आहे

*मृणाल गोरे यांच्या बरोबर चंद्रपूर येथे व्ही.पी. सिंग यांनी तेंदूच्या पानासाठी सत्याग्रह केला होता. निवडणूका समोर ठेऊन 'हीरो' होण्याचाच हा एक प्रकार होता.*



## तेंदूच्या पानावर

व्ही.पी. म्हणाले मृणालला
''नव्या नव्या घोषणामध्ये
काय बाकी उरतं गं?
तेंदूच्या पानावर
मन माझ झुरत गं''

## लूटमार

सुहास्यवदनी काऊंटरवरुनी
वदली ती 'कॅशीयर' बाला –
" 'करंट' खात्यातून काढुनि
'फीक्स डिपॉझीट' घाला"

घरची रिझर्व बँक सोडुनि
घडली अनर्थ कहाणी
नऊ महिन्याचे 'व्याज' कडेवर
गाऊ लागले गाणी
'रिझर्व' बँकेने शटर ओढले
घालू कुणाशी वाद ?
परबँकेने लुटले असता
करू कुठे फिर्याद ?

**दिवाळी १९८६ (तरुण भारत, मुंबई)**



*अंगवस्त्र जेव्हा वस्त्र फाडू लागते तेव्हा –*

*पाताळगंगेच्या शेतकरी आंदोलनात शरद जोशी यांनी एकाएकी माघार घेतली. धीरुभाई प्रसन्न झाले. पुढे दिल्लीच्या किसान मेळाव्यात किसान नेते टिकैत यांनी त्यांना स्टेजवरुन उचलून खाली फेकले.*

## बा – मना!




जाट तापले तापले
अशी कशी दशा झाली
तिथे जोशीला टिकैत
फेके उचलून खाली
नको 'भारत-इंडिया'
आता सह्याद्रिच बरा
पाताळगंगेच्या किनारी
'धीरु'भाईचा आसरा

असो पवार वा जोशी
इथं जातिभेद नाही
गुणवंताच्या पाठीशी
उभा महाराष्ट्र राही।।

## बदल

कलकत्याच्या रस्त्यावर
एक मार्क्सवादी
जोरजोराने ओरडत होता –
''उद्याचा सूर्य लाल आहे
उद्याचा चंद्र लाल आहे
उद्याचं आकाश लाल आहे''
तेव्हा गांधीबाबाच्या सावलीतील
बीजींगचा रस्ता म्हणाला –
"सलाम ! कॉम्रेड सलाम !!
मार्क्स परिस्थितीचा गुलाम
तत्वाचा नसून प्रश्न स्वत्वाचा आहे
मानवी मनाच्या अस्तित्वाचा आहे
म्हणूनच गोर्बाचेव महत्वाचा आहे''

जानेवारी १९९०

*'मारुती कुठे उभी असेल तर साक्षात भ्रष्टाचार उभा आहे असं समजा' असं एकदा लोकसत्ताचे संपादक श्री. माधव गडकरी म्हणाले होते. परंतु त्यांच्या वाढदिवसाला त्यांच्या गोव्याच्या मित्रांनी मारुती गाडीच भेट दिली. त्यांची खूपच पंचाईत झाली.*

## मारु-ती

एक्स्प्रेस टॉवरखाली
हळूच दबकत दबकत आली
लाल लाल साडी नेसून
ठुमकत मुरडत लचकत आली
मारु-ती आपलीच असावी
असं प्रत्येकाला वाटत असतं
जेव्हा ती भेटत नसते
तेव्हा काळीज फाटत असतं
असाच कोणी धनी गोवेकर
आम्हालाही भेटू द्या देवा
आमच्या संसाराचा गाडा
मारु-तिच्या गॅरेजमध्येठेवा
मारुतिच्या गॅरेजमध्ये ठेवा



## महान भारत

गदा जाऊन पिस्तुल आलं
जाणीव पदोपदी झाली
पाच पांडवांना वरुन
लोकशाही द्रौपदी झाली
हाती 'चक्र' घेणारांचा
सर्वत्र गौरव झाला
पांडव म्हणून मिरवणारा
'हात' आज कौरव झाला
कर-नाटक गडगडले
काय 'हे-गडे' पाप नाही?
मेनका सांगते आहे
'विश्वामित्र' बाप नाही

२८ नोव्हेंबर १९८९

## परिवर्तन

एकशे पंचेचाळीसच्या बेरजेसाठी
जोर जोरात पळू लागले
'सलीम-सिध्दार्थ' च्या दारात
पाटील लेझीम खेळू लागले
१५ मार्च - १९९०

*मुस्लीम दलितांनी सहकार्य केल्यामुळेच महाराष्ट्रात पुन्हा कॉंग्रेस सत्तेवर आली.*
*दलित नेत्यांचे सत्कार साखर कारखान्यावर सुरु झाले.*

## ‘अंकुश’

लूना पडली अशी पालथी
काच चष्म्याची फुटली
स्पर्श न होता तुमचा राया
गाठ आपोआप सुटली

रस्त्यांचे अंथरुण जाहले
फूटपाथची उशी
पादचारी हे बघूनी हसती
आता उठू मी कशी ?

प्रशासनावर नाही ‘अंकुश’
काय करतील काकडे ?
जागोजागी पडले खड्डे
पाऊल पडते वाकडे

*पुण्यात पावसामुळे रस्ते खराब झाले होते. अपघातांची संख्या वाढली होती. तेव्हा येथील नागरिकांनी महापालिकेवर प्रचंड मोर्चा नेला होता. त्यावेळचे महापौर श्री. अंकुश काकडे यांना एक निवेदन देण्यात आले होते.*

## नशीब

त्यांनी भगवी शाल पांघरीत
तुळजाभवानीला कौल लावला
यांना मात्र
फुले, आंबेडकर आणि
'मस्तान' सुध्दा पावला

मार्च - ९०

## सामना

पाईप म्हणाला -
''तंबाखू कमी असला तरी
धूर तितकाच सोडणार आहे
आजच कसं सांगू ?
कोण कोण फोडणार आहे ?''
तेव्हा बारामतीकर म्हणाले -
''दीडशे पक्के आहेत
एक सुध्दा हलणार नाही
महात्मा फुल्यांच्या मळ्यात
'ब्रह्म- कमळ' फुलणार नाही''

मार्च - ९०

मराठी ग्रं... संग्रहालय ठाणे

## रामा रे रामा

आम्हाला 'आठवले'
की आमचेही नाव 'रामदास' आहे
केवळ दलित नसल्यामुळेच
असा हा वनवास आहे

मार्च - ९०

REFBK-0026135
REFBK-0026135